**तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,**
**3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.**
दूरध्वनी - 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स - 22692102.
E-mail : diplomadesk10dte@gmail.com Internet :http/www.dte.org.in

**महत्त्वाचे/कालमर्यादित**
21.10.2015

क्रमांक : 10/पदविका/एआरसी/बँकेचे प्रपत्र/2015/ ११७१
दिनांक : 15 OCT 2015

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती/औरंगाबाद/मुंबई/नागपुर/नाशिक/पुणे.

**विषय :-शासनामार्फत होणारी सर्व प्रकारची प्रदाने ईसीएस/एनईएफटी मार्फत करण्यासाठी आवश्यक माहिती सादर करणेबाबत**

**संदर्भ:-**
1. **शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक संकीर्ण 1010/प्र.क्र. 68/कोषा प्र-5 दिनांक 18.8.2011.**
2. **या संचालनालयाचे पत्र क्र. 10/पदविका/एआरसी/बँकेचे प्रपत्र/2015 /217 दि. 17.3.2015.**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, शासनामार्फत होणारी सर्व प्रदाने ईसीएस/एनईएफटीची सुविधा वापरुन करण्याबाबत शासनाने आदेश निर्गमित केलेले आहेत. ईसीएस/एनईएफटी व्दारे प्रदान करण्यासाठी आवश्यक तपशिलाचे विवरणपत्र शासनाने निर्धारित केले आहे. शैक्षणिक वर्ष 2015-16 मध्ये आपल्या अधिनस्त असलेल्या **दहावी व बारावी नंतरच्या व थेट व्दितीय वर्ष पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेश स्विकृती केंद्राकडुन (एआरसी)** शासनाच्या प्रपत्रामध्ये माहिती भरण्याबाबत कळविण्यात यावे. आपल्या अधिपत्याखालील सर्व एआरसीची माहिती **मुळ प्रतीत** एकत्रित संकलित करुन ती या **संचालनालयास दिनांक 21.10.2015 पर्यंत** जमा करण्यात यावी. आपल्या अधिपत्याखालील सर्व एआरसीची माहिती संकलित झाली आहे याची खातरजमा करुनच ही माहिती आपल्या कार्यालयामार्फत या संचालनालयास जमा करण्यात यावी. कोणत्याही परिस्थितीत संस्थांना या संचालनालयास थेट माहिती सादर करण्यास कळविण्यात येऊ नये.

संचालनालयाकडुन संस्थांना अदा करावयाच्या रक्कमांसाठी सदर माहिती आवश्यक असल्यामुळे या प्रकरणी त्वरीत माहिती घेण्यात यावी व तशा सूचना सर्व एआरसीना त्वरीत निर्गमित करुन माहिती संकलित करुन संचालनालयास सादर करण्यात यावी. माहिती देण्यासाठीचे प्रपत्र "जोडपत्र-अ" सोबत जोडत आहे

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई.

सहसंचालक तंत्रशिक्षण
प्रादेशिक कार्यालय, नागपूर
आवक क्रमांक ...8004...
दिनांक 26 OCT 2015

---

सहसंचालक तंत्रशिक्षण विभागिय कार्यालय, नागपूर.
क्र :–तंशिसं/विकाना/पदविका/२०१५/ 3370
दि. 2 NOV 2015

प्रति,
प्राचार्य,
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित /विनाअनुदानित
पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था,
नागपूर विभाग .

वरील पत्रातील सूचनांनुसार संस्थांना देय असलेल्या रकमा संचालनालयाकडून वेळेत संबंधीतानां अदा करण्याकरिता सोबत जोडलेल्या जोडपत्र –अ मधील माहिती बँकेच्या सही शिक्यासह आपल्या कार्यालयाच्या लेटर हेडसोबत मूळ प्रत या कार्यालयास तात्काळ पाठविण्यांत यावी.जेणेकरुन प्रवेश प्रक्रीयेचे मानधन तसेच कौन्सलींग राऊंडमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क संबंधीत संस्थेस अदा करणे सोईचे होईल.

( गुलाबराव ठाकरे )
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागिय कार्यालय,
नागपूर

प्रत:– प्रोग्रामर , यांनी सदरचे पत्र या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

शासन निर्णय क्रमांक संकीर्ण १०१०/ प्र क्र ६८/ कोषा प्र-५, दिनांक १८ एप्रिल, २०११ चे सहपत्र

## जोडपत्र-अ

ईसीएस/ एनईएफटी/द्वारे प्रदाने प्राप्त करण्यासाठीचा तपशिल

१. ~~संस्थेचे नाव व डीटीई कोड~~

२. कार्यालयाचे नाव व पत्ता

३. बँक खाते क्रमांक

४. बँक खात्याचा प्रकार

५. बँकेचे नाव

६. बँक शाखेचे नाव व पत्ता

७. बँक शाखेचा संकेतांक

८. एमआयसीआर क्रमांक

९. आयएफएससी संकेतांक

दिनांक :

**संस्थाप्रमुखांची सही**

**बँकेचे प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, वरील माहिती मी तपासून पाहिली असून ती योग्य आहे.

बँक शाखा प्रमुख

........ (**बँक शाखेचे नाव व शिक्का** )

D:\Budage\2015-16\General Correspondence\IFSC code of institutes.docx